IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0441 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/04/2024 09:31

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 22/04/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/04/2024
   **Time From (वेळेपासून):** 16:34 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:34 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/04/2024 **Time (वेळ):** 09:31 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/04/2024 09:31 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मदर इंडीया स्विट्स मार्टचे बाज, असलेल्या रोशन मोदी यांचे पानटप,वसंतविहार सर्कल ठाणे

**(c)In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** निलेश शिवाजी तावडे

**(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 402,सोनल निकेतन सोसायटी, ,समाज मंदिर हॉल शेजारी,टिळकनगर, डोंबिवली पुर्व,जि ठाण,डोंबिवली,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 402,सोनल निकेतन सोसायटी, ,समाज मंदिर हॉल शेजारी,टिळकनगर, डोंबिवली पुर्व,जि ठाण,डोंबिवली,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8652560788

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री राजु धोंडीराम आकरुपे | | | 1. बी/02, 501, पोखरण रोड न 01,विहंग गार्डन, रेमंड गेटच्या , समोर समतानगर ठाणे प,वर्तक नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रोशन राजेंदर मोदी | | | 1. विशाल हॉटेल गल्ली,, हनुमान मंदीर, भवानी नगर ,गोकुळनगर ठाणे,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

लागलीच दाखल

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

चितळसर पोस्टे गुन्हा रजि नं 441/24 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन 2018)चे कलम 7 अ,12प्रमाणे

मी, निलेश शिवाजी तावडे, वय-53 वर्षे, धंदा-सिव्हील कॉन्ट्रक्टर ठाणे महानगरपालिका, रा. फ्लॅट नं. 402, सोनल निकेतन सोसायटी, समाज मंदिर हॉल शेजारी, टिळकनगर, डोंबिवली पुर्व, जि. ठाणे मो. नं. 8652560788 समक्ष चितळसर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, '' माझी पत्नी सौ नेहा निलेश तावडे हिचे नावाने कळवा पोलीस चौकी जवळ कळवा, भाजी मार्केट, कळवा शिवाजी महाराज चौक या ठिकाणी एनर्जी केंद्र/दुध केंद्राकरीता मातृदुग्धशाळा कुर्ला यांचेकडुन तसेच ठाणे महानगरपालीके कडुन सन 2007 मध्ये परवानगी दिलेली असुन ते शासनमान्य आहे.

त्यानुसार शिवसेना शाखे शेजारी शिवाजी महाराज चौक, कळवा येथे असलेली 3 × 5 फुट मोजमापाची जागेवरील दुधकेंद्र सुरु करुन आम्ही दुध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री करुन आमचा उदरनिर्वाह करत होतो परंतु, प्रभारी व्यवस्थापक मातृदुग्धशाळा कुर्ला यांचेकडुन दुध व दुग्धजन्य पदार्थ यांचा पुरवठा बंद केल्याने आम्ही आमचा उदरनिर्वाह करण्याकरीता सदर ठिकाणी दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय, पाणी, ज्युस तसेच वडा, समोसा भजी यांची विक्री करुन आमचा उदरनिर्वाह करत असतो. सदर शिवाजी महाराज चौक, कळवा येथे असलेल्या टपरीवर आम्ही वर नमुद पदार्थ विक्री करीता आमचे ओळखीचा श्री. राहुल कुमार अगरवाल रा. गोकुळ नगर, विशालनगर ठाणे यांस मासिक 4500/-रु पगारावर कामावर ठेवले होते. दि. 13/12/2023 रोजी मी व माझी पत्नी असे आम्ही आमचे गावी गेलो होतो. त्यानंतर दि. 16/12/2023 रोजी परत आल्यानंतर मला समजले की, आमचे दुकानामध्ये विमल पान मसाला, तंबाखु/गुटखा मिळुन आल्याने अन्न व औषध प्रशासन विभागाकडुन कारवाई करण्यात आली असुन श्री राहुल कुमार अगरवाल यांचेवर कळवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. I 681/2023 भादवि कलम 188,272,273,328,सह सुरक्षा व मानके अधिनियम 2006, चे कलम 26(242) (4) 27(3) डी, 27(3) ई सहवाचन कलम 3(1)(झेडझेड)(5) शिक्षा कमल 59 नुसार दि. 14/12/2023 रोजी दाखल करण्यात आला आहे. त्यास पोलीस कोठडीमध्ये ठेवण्यात आले असल्याचे मला समजले. त्यानंतर मी शिवाजी महाराज चौक, कळवा येथे असलेल्या आमचे दुकान/टपरीवर येवुन पाहीले असता, सदरची टपरी ही बंद करण्यात आली असुन टाळयावर सिल केलेले मला दिसुन आले.

त्यानंतर दि. 03/01/2024 रोजी गुन्हा दाखल करणारे अधिकारी श्री राजु आकरुपे अन्न सुरक्षा अधिकारी यांची भेट घेण्याकरीता त्यांचे अन्न व औषध कार्यालयात, ठाणे येथे गेलो असता ते कार्यालयात नसल्याने त्यांचे कार्यालयातुन श्री. आकरुपे यांचा मोबाईल नंबर घेवुन फोन केला व त्यांना माझी ओळख सांगुन त्यांनी कारवाई केलेल्या माझे टपरी/दुकानाचे सिल खोलुन दुकाण सुरु करुन देणेबाबत मी विनंती केली असता, त्यांनी मला कोर्टमध्ये अर्ज करा त्यानंतर कोर्ट मला से साठी विचारेल त्यावेळी तुम्ही मला येवुन भेटा काय तरी मार्ग काढु असे सांगीतले.

त्यानुसार मी वकीलांचेकडुन दि. 17/01/2024 रोजी न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग - ठाणे यांना माझे दुकानचे सिल उघडुन मिळणेकरीता अर्ज सादर केला होता परंतु मा. न्यायालयाने माझा अर्ज फेटाळला. त्यानंतर मी दि. 15/03/2024 रोजी सेशन कोर्ट ठाणे येथे सदरबाबत अर्ज केला. सदर अर्जावर दि. 22/03/2024 रोजी सुनावणी करीता मी जात असते वेळी श्री आकरुपे यांनी मला फोन केला व सेशन कोर्टात कशाला अर्ज केला असे मला विचारले. त्यावेळी मी काय करणार साहेब आमचा उदरनिर्वाह त्यावरच चालतो त्यामुळे मी अर्ज केला आहे.

त्यावेळी त्यांनी मला या कोर्टात भेटु आपण असे सांगीतले परंतु ते मला कोर्टात भेटले नाही. त्यांनतर मला संध्याकाळी 4 वाजण्याच्या सुमारास श्री आकरुपे यांचा फोन आला त्यावेळी त्यांनी मला तुमचे काम 50 टक्के झाले असुन सेशन कोर्टाने ऑर्डर तुमचा अर्ज ग्राहय धरुन प्रथम वर्ग कोर्टाला आदेश दिलेले आहेत. तरी मा. न्यायालयाने ऑर्डर दिल्यानंतर तुमच्या दुकानाचे सिल मलाच खोलायचे आहे. त्यामुळे तुम्ही मला येवुन भेटा यातुन काय तरी मार्ग काढु असे सांगीतले. त्यांनतर एक तासभराने पुन्हा श्री आकरुपे यांनी मला फोन करुन सांगीतले की, ' मी 28 तारखे पर्यंत बाहेर आहे त्यामुळे 28 तारखे नंतर फोन करुन भेटण्याबाबत सांगीतले.' त्यांनतर मी माझे कुटुंबासोबत माझे मुळगावी होळी करीता गेलो होतो.

त्यानंतर मी गावावरुन परत आल्यानंतर आज दि. 01/04/2024 रोजी माझे दुकानाकडे जावुन पाहीले असता अदयाप पर्यंत माझे दुकाणाचे सिल तसेच आहे.

तरी मी श्री आकरुपे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन ठाणे यांना भेटण्याकरीता गेल्यास श्री आकरुपे अन्न सुरक्षा अधिकारी हे त्यांचे करीता माझे दुकानाचे सिल उघडुन सुरु करुन देणेकरीता म्हणुन माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी करण्याची शक्यता आहे परंतु त्यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी केल्यास मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची अजिबात इच्छा नाही. करिता माझी त्यांचेविरुध्द लाचेच्या मागणीबाबत कायदेशीर तक्रार आहे. त्याप्रमाणे त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.'' वगैरे मजकुराची कायदेशीर तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे कार्यालयात दि. 01/04/2024 रोजी दिली आहे.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि. 02/04/2024 रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन दिल्यानंतर मी पंच नं 01 श्री पिंगळे यांचेसह लोकसेवक श्री आकरुपे यांचे कार्यालयात गेलो असता, लोकसेवक श्री अकरुपे हे त्यांचे कार्यालयात नसल्याने मी माझे मोबाईलवरुन लोकसेवक आकरुपे यांना फोन केला व माझे कामा संदर्भात विचारणा केली असता, त्यांनी मला कोर्टाची ऑर्डर झाली आहे का? याबाबत विचारणा केली व सदर ऑर्डरची कॉपी कार्यालयात देवुन जा उदया भेटुया मी नवी मुंबईला आलोय जरा असे सांगीतले त्यामुळे मी फोन कट केला व पंचासह पडताळणी पथका ज्या ठिकाणी थांबुन राहीले होते त्या ठिकाणी परत आलो. सदर पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी दि. 03/04/2024 रोजी भेटण्याकरीता बोलविलेबाबत निश्पन्न झाले तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि. 03/04/2024 रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन मला लावुन दिल्यानंतर मी पंच नं 01 श्री पिंगळे यांचेसह जावुन लोकसेवक श्री राजु आकरुपे यांची भेट घेतली असता, त्यांनी माझेकडे माझे सिलबंद करण्यात आलेले दुकान/टपरी उघडुन देण्याकरीता कोर्टाची ऑर्डर झालेनंतर आपण या मी तुम्हाला तुमची टपरी/दुकानचे सिल उघडुन देतो असे सांगीतले. त्यानुसार मी व पंच असे पडताळणी पथका ज्या ठिकाणी थांबुन राहीले होते त्या ठिकाणी परत आलो. सदर पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी कोर्टाची ऑर्डर झालेनंतर भेटण्याकरीता बोलविलेबाबत निश्पन्न झाले तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई करुन सिलबंद करण्यात आलेले माझे दुकान/टपरीचे सिल उघडे करुन देण्याबाबत मा. न्यायालयाकडुन दि. 15/04/2024 रोजी आदेश प्राप्त झाले. त्यानुसार दि. 16/04/2024 रोजी सर्व कायदेषीर बाबींची पुर्तता करुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन मला लावुन दिल्यानंतर मी पंच नं 01 श्री पिंगळे यांचेसह लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो असता, लोकसेवक श्री आकरुपे हे त्यांचे कार्यालयात नसल्याने मी माझे मोबाईलवरुन त्यांना फोन केला व मा. न्यायालयाने दुकान/टपरीचे सिल उघडे करुन देण्याबाबतचे आदेश मिळालेले आहेत असे सांगीतले त्यावेळी त्यांनी मला सदर ऑर्डरची मुळ प्रत त्यांचे कार्यालयात जमा करा आम्ही दुकानाचे सिल उघडे करुन देतो असे सांगितले. त्यानुसार मी कोर्टाची ऑर्डर माझे अर्जासह अन्न व औषध प्रशासन कार्यालयात जमा केली व पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबुन राहीले होते त्या ठिकाणी परत आलो. सदर पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी कोर्टाचे ऑर्डर नुसार आमचे टपरीचे सिल उघडे करुन देणार असलेबाबत निष्पन्न झाले तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यांनतर दि. 20/04/2024 रोजी लोकसेवक श्री राजु आकरुपे यांनी माझी पत्नी सौ नेहा निलेश तावडे हिचे समोर कळवा नाका येथील माझे दुकान/टपरीचे सिल उघडे करुन दिले. सदर वेळी आमचे ओळखीचे श्री रोशन मोदी यांचेकडे दुकान/टपरीचे सिल ओपन करुन दिलेचा मोबदला म्हणुन काय तरी चाय पानी करण्याकरीता मला सांगण्यास सांगीतले. त्यानुसार श्री रोशन मोदी यांनी सदर वेळी मला फोन करुन आकरुपे साहेब चाय पानी म्हणुन पाच हजार रुपये मागत आहेत असे मला त्यांनी सांगीतले. त्यावेळी मी त्यांना सोमवारी येवुन भेटतो सध्या मी बाहेर आहे असे सांगीतले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक श्री आकरुपे यांनी मला माझे मोबाईलवर फोन करुन सोमवारी येवुन भेटा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे मी येतो सोमवारी असे सांगीतले. त्यानुसार दि.

22/04/2024 रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दोन पंच साक्षीदार यांचे समक्ष करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री राजु आकरुपे यांची भेट घेण्याकरीता जाण्याकरीता म्हणुन आमचे ओळखीचे इसम श्री रोशन मोदी यांला मी फोन केला व आकरुपे साहब को मिलने जाना है असे विचारले त्यावेळी त्यांनी मला '' आकरुपे यांना फोन किया मगर उन्होने फोन नही उठाया ..... फिर से फोन लगाते है ...वो उधर नही होगा तो फिर फोकटा का दुकान बंद करके भी हमको भी जाना पडेगा.....असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्याला ठिक आहे असे सांगीतले. त्यांनतर खाजगी इसम रोशन यांनी जैसे बात करता हूँ..... मै आपको तुरंत कॉल करते है असे सांगीतले त्यावेळी तक्रारदार यांनी ठिक आहे असे बोलुन फोन ठेवुन दिला..... सदर वेळी सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर वर ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यांनतर काही वेळाने पुन्हा मी माझे मोबाईलवरुन खाजगी इसम श्री रोशन मोदी यांना माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन फोन केला व हो गया बात असे विचारले असता त्यांना मला सांगीतले की, '' बोले की.... ऐसा ऐसा बात है..... एक काम करो तुम्ही तुम्ही लेके रखो..... तेरे पास से मै ले लुंगा..... बोले सर .... नही सर वो मिलना भी चाहते है आपसे ऐसा बताया तो वो बोले '' तो बोले नही.... फिलहाल तो हमारे पास टाईम नही है ..... फिर वो मेरेसे आके ले लेगा.....'' असे आकरुपे यांनी सांगीतले असलेबाबत त्यांनी मला सांगीतले. '' पैसे का कुछ बोला है क्या....'' असे विचारले. त्यावेळी त्यांनी मला '' पैसे का वही..... बोल रहा था... जैसे पाच हजार के आस पास'' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना '' पाच हजार बोले है क्या....'' असे विचारले त्यावेळी खा. इ. रोशन यांनी '' हा..... पाच हजार बोला है.....'' असे सांगुन लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी '' कौन ..... हॅलो.... कौन आकरुपे......'' असे विचारले त्यावेळी त्यांनी '' हा.... हा.... आकरुपे सर..... आकरुपे सर '' असे सांगीतले. त्यानंतर रोशन यांनी सांगीतले की, '' वो.....वो.... उनको मैंने बात किया ना तो उसने क्या बोला ..... एक काम .... एक काम कर ना बेटा तुम्ही लेके रख लेना......असे सांगीतल्याचे मला सांगीतले. त्यावेळी मी त्यांना तो पैसा कब दे दु तेरे पास असे विचारले असता त्यांनी आ.... निलेश भाई आपकी मर्जी ...... आज देंगे तो ठिक है..... कल देंगे तो वो भी ठिक है....असे मला सांगीतले. त्यावेळी मी खाजगी इसम रोशन यांस ठिक है पाच देने का है ना.....असे विचारले त्यावेळी त्यांनी हा.... हा..... पाच असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांस फोन .... फोन करता हू तेरे को मै. असे सांगुन सदर वेळी फोन कट सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर मी काही वेळाने खाजगी इसम यांना पंचा समक्ष फोन करुन क्या करुं मै आउं उधर?...असे विचारले असता त्यांनी मला येण्याबाबत सांगीतले. त्यानुसार मी त्याला तेरे दुकान पे है ना तु.?.. किधर अपना माजिवाडा वाला? ..असे विचारले त्यावेळी त्यांनी वो .. वसंत विहार ... वसंत विहार ... हॉं... असे सांगीतले. त्यानुसार मी त्याला ठिक है आता हु असे बोलुन फोन ठेवुन दिला..... सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. सदर वेळी झालेल्या पडताळणीमध्ये खाजगी इसम श्री रोशन मोदी यांनी लोकसेवक श्री राजु आकरुपे यांचेकरीता म्हणुन 5,000/-रु लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्या अनुषंगाने वेळे अभावी पुढील सापळापुर्व व सापळा पंचनामा कारवाई लागलीच करण्यात येणार असल्याचे दोन्ही पंचास व मला सांगुन त्यास अनुसरून सापळापूर्व कारवाई सुरू करण्यात आली. सदर वेळी पोउपअधी श्रीमती पाटील यांनी मला लाचेची रक्कम म्हणुन 5,000/-रुपयांची व्यवस्था करणेबाबत सांगीतले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेल्या 500/-रु दाराच्या 10 नोटा पंचा समक्ष हजर केल्या. त्यानंतर पोउपअधी श्रीमती पाटील यांचे आदेशानुसार सदर लाचेची रक्कम म्हणुन मी हजर केलेल्या सर्व नोटांना दोन्ही बाजुन अँन्थ्रासिन पावडर लावुन सदरची रक्कम ही माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यामध्ये शासकीय वाहनावरील चालक यांनी ठेवुन दिली. त्यानंतर सापळा कावाई करीता शासकीय वाहनाने सर्व सापळा पथक दोन्ही पंच व मी शासकीय वाहनाने वसंत विहार येथे रवाना झालो. वसंत विहार नाका येथे पोहचल्यानंतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मला लावुन दिल्यानंतर मी व पंच नं 01 असे पायी चालत रोशन मोदी यांचे पान टपरीकडे निघालो. सदर वेळी सापळा पथक आमचे पाठोपाठ येवुन सदर इंडीया स्विट्स मार्टच्या समोरील बाजुस चौकामध्ये कोणास संशय येणार नाही असे माझेकडे लक्ष देवुन उभे राहिले. त्यानंतर मी व पंच असे सदर इंडीया स्विट्स मार्टचे बाजुस असलेल्या रोशन मोदी यांचे पानटपरीवर जावुन रोशन यांची भेट घेतली. सदर वेळी त्यांस रोशन ... कैसा है ....असे विचारले. त्यावेळी त्यांनी मला एकदम बढीया ... चाय पियंगे क्या कोल्ड्रींक मंगाऊ?....असे विचारले. त्यावेळी मी त्याला '' कुछ नही ... चाय बीय मत .... देख क्या मेरेको पहलेही टाईम हो गया है ... मेरेको शादी में जाने का है .... मै बोला आज जो है अपना काम करके निकल जायेगा ... साहाब को पैसा देनेका है ना ... कितना बोला है ...'' असे विचारले. त्यावेळी रोशन ने मला '' सबसे पाच पांच हजार रूपये दिया हूँ ... जो बोला पाच हजार ... सामनेवाला भी दिया है ... कॉर्नर वाला भी दिया है .... '' असे सांगीतले. त्यांनतर मी रोशला सांगीतले की, '' एक

काम कर ना ... फोन लगा दे ... मैं बात करता हुँ फोन पे जरा साईड में जाके...." असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला सांगीतले की, " जादा करके वो व्हॉट्सॲप कॉलींग पे ही बात करते है ... " असे मला सांगीतले असता मी रोशनला " कौनसा भी कॉलींग लगा रे ...खाली बात होना मंगता है ... " त्यानंतर रोशन यांनी लोकसेवक श्री राजु आकरुपे यांचे मोबाईलवर वॉट्स ॲप कॉल केला असता, लोकसेवक आकरुपे यांनी त्याचा फोन उचलला नाही. सदर वेळी मी रोशनला विचारले की, तेरेको बोले क्या पैसा लेके रख ... त्यावेळी त्यांनी मला " बोले जो ...जो भी होता है उनसे लेके तुम्हारे पास रख मै फिर लेके जाएगा .." असे सांगीतले. त्यानंतर मी पुन्हा रोशन यांस " तेरेको बोला है पैसा लेके रखने को...? असे विचारले त्यावेळी त्यांनी मला हाँ वो तो बोला था...असे सांगीतले. त्यानंतर मी माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यातुन माझे उजवे हाताने लाचेची रक्कम बाहेर काढुन रोशन मोदी यांचे समोर धरली असता त्यांनी 5 हजार लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन मोजुन त्यांचे पॅन्टचे मागील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवत असतांना मी त्याला गिन के ले असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला साहेब गिनती क्या ... आप क्या कम देंगे...? असे मला सांगीतले. त्यांनतर मी त्याला " पैसा देने के बाद कारवाई नही होएगा ना ...?" असे विचारले त्यावेळी त्यांनी मला नही होएगा हाँ... ऐसा तो बोला है ...असे सांगीतले. त्यांनतर त्यांनी मला " समझ रहे है ..? क्यों की ऐसा पैसा वैसा लेने के लिए सिस्टम जो होता है ना ... वो सामनेवाला भी डरता है इसकेलिए बोलता है रोशन तुम लेके रखले मैं लेके जाता हुँ... बाकी कुछ नही .... सामनेवाले को भी लगता है ना अगर मेरा भी नाम आ गया तो मेरा नौकरी भी खो बैठने का ..." असे सांगीतले. त्यांनतर मी माझे डोळ्यावरील चष्मा काढुन माझे शर्टचे खिश्यामध्ये असलेला गॉगल डोळ्यांवर लावुन लाचेची रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला असता, सापळा पथकाने खाजगी इसम श्री रोशन मोदी यांना 16.34 वा. रंगेहात लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यांनतर खाजगी इसम रोशन मोदी यांस ताब्यात घेतल्यानंतर सुरु असलेल्या कारवाई दरम्यान खाजगी इसम रोशन मोदी यांचे मोबाईलवर लोकसेवक श्री आकरुपे, अन्न व सुरक्षा अधिकारी यांचा फोन आला असता, तो खाजगी इसम रोशन यांनी उचलला. त्यावेळी लोकसेवक श्री आकरुपे यांनी " बोल रे बेटा असे बोलुन विचारले त्यावेळी खाजगी इसम रोशन मोदी यांनी लोकसेवक श्री आकरुपे यांना " हाँ सर आपने बोला था ना सेठ से बात करने के लिए ..." असे सांगीतले. तेव्हा लोकसेवक आकरुपे यांनी " हा बोल ना... बोल ना क्या हुवा ... " असे विचारले. त्यावेळी खाजगी इसम रोशन यांनी " हाँ तो वही आ के हमारे पास पैसा दिए ..." असे बोलुन मी पैसे देलेबाबत सांगीतले. त्यावेळी लोकसेवक श्री राजु आकरुपे यांनी " ठिक है ... ठिक है ... ठिक है... ठिक है असे बोलुन लाचेची रक्कम स्विकाराबाबत सहमती दर्शवुन प्रोत्साहन दिले असुन सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे.

अशाप्रकारे यातील लोकसेवक श्री राजु आकरुपे, अन्न व सुरक्षा अधीकारी यांचे विरुध्द दिलेल्या लाचेच्या मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान यातील खाजगी इसम श्री रोशन मोदी यांनी माझेकडे माझे दुकानाचे सिल उघडे करुन दिल्याचा मोबादला लोकसेवक श्री राजु आकरुपे यांना देणेकरीता म्हणुन 5,000/-रु लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती स्विकारली असता रोशन मोदी यांस रंगेहात पकडण्यात आले असुन यातील लोकसेवक श्री राजु धोंडीराम आकरुपे, अन्न व सुरक्षा अधिकारी यांनी त्यास सहमती दर्शवुन लाचेच्या मागणी व स्विकारास प्रोत्साहन दिले म्हणुन माझी लोकसेवक 1)श्री राजु धोंडीराम आकरुपे, अन्न व सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन ठाणे रा. प्लॅट नं. बी/02, 501, विहंग गार्डन, रेमंड गेटच्या समोर, पोखरण रोड नं 01, समतानगर ठाणे प. व 2)खाजगी इसम रोशन राजेंदर मोदी, वय - 30, रा. विशाल हॉटेल गल्ली, हनुमान मंदीर, भवानी नगर गोकुळनगर ठाणे पश्चिम, मुळ रा. आदर्श कॉलनी, रामपुर, जि. देवधर राज्य झारखंड यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉवर मराठीत टंकलिखीत केली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

वरील मजकुराची तक्रार केल्याने ठाणे दैनंदिनीमध्ये गुन्हा रजिस्टरी नोंद घेवुन खबरी अहवालाची प्रत विनामुल्य तक्रारदार यांना देण्यात आली आहे. गुन्ह्याचे खबरी अहवालाची प्रत मा.न्यायालयात सादर करण्याची तजविज ठेवली आहे.गुन्ह्याची माहीती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.यांना देण्यात आली आहे.गुन्ह्याचा प्राथमिक तपास हा स.पो.नि. फडतरे यांचेकडे देण्यात आला आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

GIRISH SHRIPATRAO GODE(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** GIRISH SHRIPATRA(

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):**

पोलीस ठाणे अंमलदार
चितळसर पोलीस स्टेशन
ठाणे शहर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**

विनामुल्य FIR. प्रत मिळाली
Nilam